*For Private Circulation Only*

# Study Circle Career Development Institute

महाराष्ट्र अराजपत्रित सेवा (गट ब)/(गट क) मुख्य परीक्षा २०२३

## पेपर क्रमांक – १ : मराठी व इंग्रजी

## (४) मराठी म्हणी व वाक्प्रचार (अर्थ व उपयोग)

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षा २०२३

## मराठी म्हणी व वाक्प्रचार (अर्थ व उपयोग) घटकावर प्रश्न असणाऱ्या परीक्षा

१) सहायक रासायनिक विश्लेषक चाळणी परीक्षा, १९ जानेवारी २०२३
२) दंत शल्यचिकित्सक चाळणी परीक्षा, २०२३
३) मुख्य प्रशासकीय अधिकारी चाळणी परीक्षा २०२३
४) सहायक मत्स्य आयुक्त चाळणी परीक्षा २०२३
**५) राज्यसेवा मुख्यपरीक्षा पेपर्स १ ते ४, २०२३**
**६) महाराष्ट्र गट क मुख्य परीक्षा पेपर १, २००३**
७) फार्मासिस्ट, वैद्यकीय महविद्यालये चाळणी परीक्षा २०२३
८) सांख्यिकी अधिकारी, सार्वजनिक आरोग्य चाळणी परीक्षा २०२३
९) कायदा अधिकारी, नगरनियोजन चाळणी परीक्षा २०१३
१०) सहायक संचालक,नगरनियोजन चाळणी परीक्षा २०२३
११) सहायक कायदेशीर सल्लागार/अव्वर सचिव, नगरनियोजन चाळणी परीक्षा , २०१३
१२) नगरनियोजन अधिकारी चाळणी परीक्षा २०२३
१३) लिपिक टंकलेखक (मुख्य) परीक्षा, १२ फेब्रुवारी २०२३
१४) दुय्यम निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क (मुख्य) परीक्षा २०२३
१५) कर सहायक (मुख्य परीक्षा) ४ मार्च २०२३
१६) उद्योग निरीक्षक, गट क (मुख्य) परीक्षा, ११ मार्च २०२३
१७) सहायक आयुक्त (औषधे ) चाळणी परीक्षा, १७ मार्च २०२३
१८) सहाय्यक (विधी) चाळणी परीक्षा, १७ मार्च २०२३
१९) कनिष्ठ भूवैज्ञानिक चाळणी परीक्षा, १७ मार्च २०२३
२०) कार्यकारी अभियंता (विद्युत) चाळणी परीक्षा, २० मार्च २०२३
२१) उपअभियंता (विद्युत-यांत्रिकी) चाळणी परीक्षा, २० मार्च २०२३
२२) महाराष्ट्र वनसेवा मुख्य परीक्षा, १६ एप्रिल २०२३
२३) महाराष्ट्र अराजपत्रित गट ब व क सेवा, संयुक्त पूर्वपरीक्षा, ३० एप्रिल २०२३
२४) महाराष्ट्र अभियांत्रिकी (सिव्हिल) मुख्य परीक्षा, २३ एप्रिल २०२३
२५) उपसंचालक आरोग्यसेवा चाळणी परीक्षा, १२ मे २०२३
२६) महाराष्ट्र अभियांत्रिकी (विद्युत) मुख्य परीक्षा, १३ मे २०२३
२७) महाराष्ट्र कृषीसेवा मुख्य परीक्षा, १३ मे २०२३
२८) उपसंचालक औद्योगिक सुरक्षा चाळणी परीक्षा, १६ मे २०२३
**२९) महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्वपरीक्षा, ४ जून २०२३**
३०) वैद्यकीय अधिकारी चाळणी परीक्षा, ८ जुलै २०२३

महाराष्ट्र अराजपत्रित सेवा मुख्य परीक्षा (गट ब)/(गट क) २०२३

पेपर क्रमांक – १ : मराठी व इंग्रजी

# (४) मराठी म्हणी व वाक्प्रचार (अर्थ व उपयोग)

१) म्हणीचा योग्य अर्थ
२) वाक्प्रचाराचा योग्य अर्थ
३) योग्य अर्थाची म्हण/पर्यायी म्हण निवडणे
४) पर्यायी वाक्प्रचार
५) म्हणीचा/वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग

Study CIRCLE

# महाराष्ट्र अराजपत्रित सेवा मुख्य परीक्षा (गट ब) / (गट क) २०२३

## पेपर क्रमांक –१ : मराठी व इंग्रजी

### १) मराठी भाषा (५०)

(१) सर्वसामान्य शब्दसंग्रह / १५
(२) वाक्यरचना / १३
(३) व्याकरण / १२
(४) म्हणी व वाक्प्रचार (अर्थ व उपयोग) / ५
(५) उताऱ्यावरील प्रश्नोत्तरे / ५

### (२) इंग्रजी भाषा / ५०

**(6) CommonVocabualry / 10**
**(7) SentenceStructure / 20**
**(8) Grammar /10**
**(9) Use of Idioms and Phrases / 5**
**(10) Comprehension / 5**

## पेपर क्रमांक – २ : सामान्य अध्ययन व बुद्धिमापन चाचणी

१) सामान्य बुद्धिमापन व आकलन / १०
२) चालू घडामोडी – जागतिक तसेच महाराष्ट्रासह भारतातील / १०
३) अंकगणित आणि सांख्यिकी / १०
४) अ) माहिती अधिकार अधिनियम, २००५ / ५
 ब) महाराष्ट्र लोकसेवा हक्क, २०१५ / ५
५) भारतीय संघराज्य व्यवस्था, राज्यघटना, स्थानिक स्वराज्य व्यवस्था, कार्यकारी मंडळ, न्यायमंडळ, विधीमंडळ / १५
६) अ) भारताचा व महाराष्ट्राचा भूगोल / १०
 ब) पर्यावरण / ५
७) सामान्य विज्ञान व तंत्रज्ञान / १५ –
 अ) भौतिकशास्त्र (फिजिक्स) / २
 ब) रसायनशास्त्र (केमिस्ट्री) / २
 क) प्राणीशास्त्र (झूलॉजी) / २
 ड) वनस्पतिशास्त्र (बॉटनी) / २
 इ) दूरसंवेदन, हवाई व ड्रोन छायाचित्रण, भौगोलिक माहिती प्रणाली व त्याचे उपयोजन / २
 फ) माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान / ५
८) अर्थव्यवस्था व नियोजन, विकास विषयक अर्थशास्त्र आणि कृषी / १५
 १) समग्रलक्षी अर्थशास्त्र, विकास विषयक अर्थशास्त्र / ६
 २) भारतीय अर्थव्यवस्था आणि कृषी / ९

# महाराष्ट्र अराजपत्रित सेवा मुख्य परीक्षा (गट ब)
# Maharashtra Non Gazzeted Services Main Examination (Group B)

## -: परीक्षा योजना :-

**प्रश्नपत्रिकांची संख्या - दोन**

**पेपर क्र.-१ - २०० गुण**
**पेपर क्र.-२ - २०० गुण**
**एकूण - ४०० गुण**

**शारीरिक चाचणी व मुलाखत - केवळ पोलीस उप निरीक्षक पदाकरीता**
**(शारीरिक चाचणी - १०० गुण, मुलाखत - ४० गुण)**

| पेपर क्र. व संकेतांक | विषय | प्रश्नसंख्या | गुण | दर्जा | माध्यम | परीक्षेचा कालावधी | प्रश्नपत्रिकेचे स्वरूप |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ (सांकेतांक १०६२) | मराठी | ५० | १०० | बारावी | मराठी | एक तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| | इंग्रजी | ५० | १०० | पदवी | इंग्रजी | | |
| २ (सांकेतांक १०६३) | सामान्य अध्ययन व बुद्धिमत्ता चाचणी | १०० | २०० | पदवी | मराठी व इंग्रजी | एक तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |

**नकारात्मक गुणदान -**

१) प्रत्येक चुकीच्या उत्तराकरीता २५% किंवा १/४ एवढे गुण एकूण गुणांमधून वजा/ कमी करण्यात येतील.

२) एखाद्या प्रश्नाची एकापेक्षा अधिक उत्तरे दिली असल्यास अथवा ज्या उमेदवाराने उत्तरपत्रिकेत पूर्ण वर्तुळ चिन्हांकित केले नसेल अशा प्रश्नाचे उत्तर चुकीचे समजण्यात येऊन त्या प्रश्नाच्या उत्तराकरीता २५% किंवा १/४ एवढे गुण एकूण गुणांमधून वजा/कमी करण्यात येतील.

३) वरीलप्रमाणे कार्यपध्दतीचा अवलंब करताना एकूण अंतिम गुणांची बेरीज अपूर्णांकात आली तरीही ती अपूर्णांकातच राहील व पुढील कार्यवाही त्याच्या आधारे करण्यात येईल.

४) एखाद्या प्रश्नाचे उत्तर अनुत्तरितअसेल तर, अशा प्रकरणी नकारात्मक गुणांची पध्दत लागू असणार नाही.

## -: अभ्यासक्रम :-

**पेपर क्रमांक - १ - मराठी, इंग्रजी या विषयामध्ये खालील घटक/ उपघटकांचा समावेश असेल.**

| अ.क्र. | विषय |
|---|---|
| १ | **मराठी :-** सर्वसामान्य शब्दसंग्रह, वाक्यरचना, व्याकरण, म्हणी व वाक्प्रचार यांचा अर्थ आणि उपयोग तसेच उताऱ्यावरील प्रश्नांची उत्तरे |
| २ | **इंग्रजी : -** Common Vocabulary, Sentence structure, Grammar, use of Idioms and phrases & their meaning and comprehension of passage. |

# महाराष्ट्र अराजपत्रित सेवा मुख्य परीक्षा (गट क)
## (सहायक मोटार वाहन निरीक्षक पद वगळून अन्य पदांकरीता)
# Maharashtra Non Gazzeted Services Main Examination (Group C)
## (All posts excluding Assistant Motor Vehicle Inspector Post)

## -: परीक्षा योजना :-

**प्रश्नपत्रिकांची संख्या - दोन**

**पेपर क्र.-१ - २०० गुण**
**पेपर क्र.-२ - २०० गुण**
**एकूण - ४०० गुण**

| पेपर क्र. व संकेतांक | विषय | प्रश्नसंख्या | गुण | दर्जा | माध्यम | परीक्षेचा कालावधी | प्रश्नपत्रिकेचे स्वरूप |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ (सांकेतांक १०६४) | मराठी | ५० | १०० | बारावी | मराठी | एक तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| | इंग्रजी | ५० | १०० | पदवी | इंग्रजी | | |
| २ (सांकेतांक १०६५) | सामान्य अध्ययन व बुद्धिमत्ता चाचणी | १०० | २०० | पदवी | मराठी व इंग्रजी | एक तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |

**नकारात्मक गुणदान -**

| |
|---|
| १) प्रत्येक चुकीच्या उत्तराकरीता २५% किंवा १/४ एवढे गुण एकूण गुणांमधून वजा/ कमी करण्यात येतील. |
| २) एखाद्या प्रश्नाची एकापेक्षा अधिक उत्तरे दिली असल्यास अथवा ज्या उमेदवाराने उत्तरपत्रिकेत पूर्ण वर्तुळ चिन्हांकित केले नसेल अशा प्रश्नाचे उत्तर चुकीचे समजण्यात येऊन त्या प्रश्नाच्या उत्तराकरीता २५% किंवा १/४ एवढे गुण एकूण गुणांमधून वजा/कमी करण्यात येतील. |
| ३) वरीलप्रमाणे कार्यपध्दतीचा अवलंब करताना एकूण अंतिम गुणांची बेरीज अपूर्णांकात आली तरीही ती अपूर्णांकातच राहील व पुढील कार्यवाही त्याच्या आधारे करण्यात येईल. |
| ४) एखाद्या प्रश्नाचे उत्तर अनुत्तरितअसेल तर, अशा प्रकरणी नकारात्मक गुणांची पध्दत लागू असणार नाही. |

## -: अभ्यासक्रम :-

**पेपर क्रमांक - १ - मराठी, इंग्रजी या विषयामध्ये खालील घटक/ उपघटकांचा समावेश असेल.**

| अ.क्र. | विषय |
|---|---|
| १ | **मराठी :-** सर्वसामान्य शब्दसंग्रह, वाक्यरचना, व्याकरण, म्हणी व वाक्प्रचार यांचा अर्थ आणि उपयोग तसेच उताऱ्यावरील प्रश्नांची उत्तरे |
| २ | **इंग्रजी : -** Common Vocabulary, Sentence structure, Grammar, use of Idioms and phrases & their meaning and comprehension of passage. |

## महाराष्ट्र अराजपत्रित सेवा मुख्य परीक्षा (गट ब)/(गट क) २०२३

# पेपर क्रमांक – १ : मराठी व इंग्रजी सविस्तर अभ्यासक्रम

# (१) मराठी (५०)

## (१) सर्वसामान्य शब्दसंग्रह /१५

१) समानार्थी शब्द–विरुद्धार्थी शब्द
२) शब्दार्थ–संज्ञांचे अर्थ
३) शब्दसमूहाबद्दल एक शब्द
४) शब्दव्युत्पत्ती – तत्सम / तद्भव
५) देशी / भारतीय / परभाषेतील शब्द
६) शब्दसिद्धी – सिद्ध शब्द / धातू
७) उपसर्गघटित शब्द
८) प्रत्ययसाधित शब्द – कृदंत – धातू साधित / तद्धित – शब्द साधित
९) अभ्यस्त शब्द – पूर्णाभ्यस्त / अंशाभ्यस्त / अनुकरण वाचक
१०) अलंकारिक / सामासिक / ग्रामीण व नागरी शब्द
११) शब्दार्थ न जुळणारा शब्द, पर्यायी शब्द / पर्यायी नसलेला शब्द
१२) विविधअर्थी एक शब्द
१३) संदर्भ शब्द रिकाम्या जागी निवडणे
१४) शब्दांचे शुद्धलेखन – शब्दाचा प्रकार, जोडशब्द
१५) लिपी, शब्दशक्ती/शब्दांचे काव्यगुण

## (२) वाक्यरचना/१३

१) वाक्याचे पृथक्करण – उद्देश व उद्देशविस्तार, विधेय व विधेयविस्तार
२) वाक्य संश्लेषण व वाक्यनिर्मिती
३) वाक्यातील कर्ता व कर्म
४) कर्तरी प्रयोग, कर्मणी प्रयोग
५) भावे प्रयोग, नवीन प्रकार

**✲ वाक्यरचनेनुसार प्रकार व रूपांतर**

६) केवलवाक्य, मुख्य आणि गौण वाक्ये
७) संयुक्तवाक्य व वाक्य रूपांतर
८) मिश्रवाक्य व वाक्य रूपांतर

**✲ अर्थावरून प्रकार व वाक्य रूपांतर**

९) होकारार्थी, नकारार्थी व वाक्य रूपांतर
१०) प्रश्नार्थक व वाक्य रूपांतर
११) उद्गारवाचक, आज्ञार्थी व वाक्य रूपांतर
१२) वाक्यातील काळ आणि आख्यात
१३) योग्य विरामचिन्हांचा वापर

## (३) व्याकरण / १२

१) वर्णाक्षरे व शब्दांच्या जाती
   १) वर्णाक्षर व मूलध्वनी
   २) स्वर
   ३) व्यंजन
   ४) अनुनासिके
   ५) वर्णरचना
   ६) जोडाक्षर
   ७) शब्दांच्या जाती
२) नाम व नामाचे प्रकार
३) सर्वनाम
४) विशेषण
५) क्रियापदांचे प्रकार, रूप व धातुसाधिते
६) क्रियाविशेषण व शब्दयोगी अव्यय
७) उभयान्वयी व केवलप्रयोगी अव्यय
८) सामान्यरूप व विभक्ती
९) लिंग व वचन
१०) संधी व समास
११) अलंकार, वृत्ते, पद्यरचना - काव्य/ओव्या
१२) वाङ्मयीन इतिहास व भाषिक सामान्यज्ञान

## (४) म्हणी व वाक्प्रचार (अर्थ व उपयोग) / ५

४१) म्हणीचा योग्य अर्थ
४२) वाक्प्रचाराचा योग्य अर्थ
४३) योग्य अर्थाची म्हण/पर्यायी म्हण निवडणे
४४) पर्यायी वाक्प्रचार
४५) म्हणीचा/वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग

## (५) उताऱ्यावरील प्रश्नोत्तरे / ५

४६) उतारा क्र.१ प्रश्न क्र.१
४७) उतारा क्र.१ प्रश्न क्र.२
४८) उतारा क्र.१ प्रश्न क्र.३
४९) उतारा क्र.१ प्रश्न क्र.४
५०) उतारा क्र.१ प्रश्न क्र.५

# (२) इंग्रजी / ५०

## (6) CommonVocabualry /10

51) Synonyms / Homonym
52) Antonyms
53) One Word substitution
54) Meaning / Wrong meaning of words, underlined words
55) Correct spelling
56) Names for groups/collection
57) Use of correct word
58) Word formation /Construction / building
59) Confusing words & Full form
60) Fill in the blanks

## (7) SentenceStructure /20

61) Types of sentences - structure
62) Types of sentences - meaning
63) Types of clauses
64) Question tags and Interrogative sentences
65) Grammatically Correct sentence
66) Grammatical error part
67) Punctuation
68) Direct - Indirect Speech
69) Active & Passive Voice
70) Degrees
71) Transformation
72) Completion of clauses
73) Meaning of sentence
74) Sentence completion
75) Sentence construction
76) Types of sentences - structure/meaning
77) Types of clauses
78) Grammatically Correct /error part/Punctuation
79) Direct - Indirect Speech
80) Active & Passive Voice

Study CIRCLE

## (8) Grammar /10

81) Types and use of Noun, Pronouns
82) Types and use of correct Adjectives
83) Types and use of Verbs, Modals
84) Types of Tenses
85) Use of correct Adverb
86) Use of correct Preposition
87) Use of correct Conjunction and Interjection
88) Use of Articles
89) Singular & Plural, Gender
90) Figure of Speech

## (9) Use of Idioms and Phrases / 5

91) Correct meaning of a phrase
92) Correct meaning of an idiom
93) Correct use of phrase
94) Correct use of an idiom
95) Gerundial phrase, Substitution of phrase / idiom

## (10) Comprehension / 5

96) Passage no.2, Q.no.1
97) Passage no.2, Q.no.2
98) Passage no.2, Q.no.3
99) Passage no.2, Q.no.4
100) Passage no.2, Q.no.5

Study CIRCLE

महाराष्ट्र अराजपत्रित सेवा मुख्य परीक्षा (गट ब)/(गट क) २०२३

पेपर क्रमांक –१ : मराठी व इंग्रजी

# (४) मराठी म्हणी व वाक्प्रचार (अर्थ व उपयोग)

**१) म्हणीचा योग्य अर्थ**
**२) वाक्प्रचाराचा योग्य अर्थ**
**३) योग्य अर्थाची म्हण/पर्यायी म्हण निवडणे**
**४) पर्यायी वाक्प्रचार**
**५) म्हणीचा/वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग**

## (१) म्हणीचा योग्य अर्थ

१) पुढील म्हणी व त्यांचे अर्थ – **योग्य** जोड्या जुळवा.

| | |
|---|---|
| a) आपापाचा माल गपापा | i) आधी आचरण बिघडते मग अवदसा येते |
| b) आधी बुद्धी जाते मग लक्ष्मी जाते | ii) खानपानात अतिरेक झाला की वाईट परिणाम होतो |
| c) अचाट खाणे, मसणांत जाणें | iii) नम्रतेने जवळीक तर क्रोधाने शत्रू तयार होतो |
| d) अन्नाचा मारलेला खाली पाहीं | iv) सहज मिळालेली वस्तू निष्काळजीपणाने खर्च करणे |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| १) | (ii) | (iii) | (i) | (iv) |
| २) | (iv) | (i) | (ii) | (iii) |
| ३) | (i) | (iii) | (iv) | (ii) |
| ४) | (iv) | (ii) | (i) | (iii) |

२) 'पाणी पाजणे' याचा अर्थ काय?
१) पाणी ग्रहण करणे २) पाणी मुरणे ३) पाणी पडणे ४) पराभव करणे

३) 'पालथ्या घड्यावर पाणी' या म्हणीतून काय सुचविले जाते ?
१) मोठे नुकसान झाले. २) केलेले प्रयत्न वाया गेले.
३) योग्य वेळी फायदा मिळवता आला नाही ४) दुर्दैव ओढवले.

४) 'धनाची करी माया उडत्या पाखराची छाया' या म्हणीचा अर्थ ओळखा.
अ) खूप पैसा मिळवला की पुढे सुख मिळते. ब) खूप श्रीमंत असतात ते पक्षी पाळात.
क) आजची श्रीमंती उद्या असेलच असे नाही. ड) स्वार्थी माणसे मोडून पडतात.
**पर्यायी उत्तरे :**
१) (अ) व (क) बरोबर २) (ब) व (ड) बरोबर
३) फक्त (अ) बरोबर ४) फक्त (क) बरोबर

५) 'बाप दाखव नाही तर श्राद्ध कर' या म्हणीचा योग्य अर्थ कोणता ?

अ) पुरावा देणे
ब) पुराव्याशिवाय बोलणे व्यर्थ
क) दोन पैकी एक पर्याय स्वीकारणे
ड) एकच मुद्दा लावून धरणे

**पर्यायी उत्तरे :**

१) अ फक्त बरोबर बाकी सर्व चूक
२) ब फक्त बरोबर बाकी सर्व चूक
३) क फक्त बरोबर बाकी सर्व चूक
४) क व ड फक्त बरोबर बाकी सर्व चूक

६) म्हणी व त्यांचे अर्थ यांच्या योग्य जोड्या जुळवा.

a) बुडत्याचा पाय खोलात
b) भरवशाच्या म्हशीला टोणगा
c) ढोंग धत्तुरा हाती कटोरा
d) बैल गेला नि झोपा केला

i) ढोंगी माणसाच्या नादी लागून नुकसान करुन घेणे.
ii) अनेक बाजूंनी नुकसान होणे
iii) नुकसान झाल्यावर उपाय करणे
iv) ज्याच्यावर विश्वास ठेवावा त्यानेच विश्वासघात करावा

**पर्यायी उत्तरे :**

१) a - (iv), b - (i), c - (ii), d - (iii)
२) a - (iii), b - (iv), c - (i), d - (ii)
३) a - (ii), b - (iii), c - (iv), d - (i)
४) a - (ii), b - (iv), c - (i), d - (iii)

७) 'वाघाच्या घरी शेळी पाहुणी' या म्हणीचा सुसंगत अर्थ व्यक्त करणारा पर्याय निवडा.

a) पाहुण्यांचा आदरसत्कार करणे ही भारतीय संस्कृती
b) जाणूनबुजून नाजूकपणा दाखविण्याची वृत्ती
c) दुर्जनाच्या तावडीत सज्जन
d) संकटात परिस्थिती पाहून चलाखपणे वर्तन करणे

**पर्यायी उत्तरे** :

१) (d) बरोबर
२) (c) बरोबर
३) (b) बरोबर
४) (a) व (b) बरोबर

८) 'इन मिन साडे तीन' या म्हणीचा योग्य अर्थ कोणता?

१) गोळाबेरीज करून राहिलेली संख्या
२) सर्वात अधिक संख्या
३) अगदी कमीतकमी संख्या
४) सर्वांमध्ये मिसळून होणारी संख्या

९) 'कुडास कान, ठेवी ध्यान' या म्हणीचा योग्य अर्थ कोणता?

a) नेहमी सावधगिरीने बोलावे.
b) मागून येऊन वरचढ होणे.
c) एकाने काम करावे दुसऱ्याने त्याचा फायदा घ्यावा.
d) साहसाने कार्य करायचे, तर संकटाची भीती बाळगू नये.

**पर्यायी उत्तरे** :

१) फक्त (c) बरोबर
२) फक्त (a) बरोबर
३) फक्त (b) बरोबर
४) फक्त (c) व (d) बरोबर

## (२) वाक्प्रचाराचा योग्य अर्थ

१) विरुद्धार्थी वाक्प्रचारांच्या जोड्या जुळवा.

| | |
|---|---|
| a) तोंडाला पाने पुसणे | i) दात कोरून पोट भरणे |
| b) पोटाला चिमटा घेणे | ii) उद्धार करणे |
| c) जमदग्नीचा अवतार असणे | iii) सोन्याचा धूर निघणे |
| d) टेंभा मिरवणे | iv) प्रेमाचे भरते येणे |

**पर्यायी उत्तरे :**

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| १) | (ii) | (iii) | (i) | (iv) |
| २) | (iv) | (i) | (ii) | (iii) |
| ३) | (iv) | (ii) | (i) | (iii) |
| ४) | (ii) | (iii) | (iv) | (i) |

२) 'अंग मेहनतीने पैसे मिळवून उपजीविका करणे' या अर्थाचा वाक्प्रचारओळखा.
१) हातावर पोट भरणे २) हात गहाण ठेवणे ३) हातावर आणणे ४) हातावर मिळविणे

३) 'षट्कर्णी होणे' या वाक्यप्रचाराचा अर्थ दर्शविणारा योग्य पर्याय निवडा.
१) सहा कर्ण असलेला होणे २) सहा जणांनी मिळून एकत्र येणे
३) गुप्त गोष्ट अनेकांना माहीत होणे ४) गुप्त गोष्ट षट्कर्णातून ऐकण

४) वाक्प्रचार व त्यांचा अर्थ सांगा योग्य जोड्या जुळवा :

| | |
|---|---|
| a) ताबूत थंड होणे | i) उगाच पावित्र्याच्या गोष्टी सांगणे |
| b) जोखडात अडकविणे | ii) युक्तीने दोष दडविणे |
| c) नाकाने कांदे सोलणे | iii) आवेश ओसरून जाणे |
| d) फुटका डोळा काळजाने झाकणे | iv) बंधनात ठेवणे |

**पर्यायी उत्तरे :**

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| १) | (iii) | (i) | (ii) | (iv) |
| २) | (iii) | (iv) | (ii) | (i) |
| ३) | (iv) | (iii) | (i) | (ii) |
| ४) | (iii) | (iv) | (i) | (ii) |

५) 'पाणी पाजणे' याचा अर्थ काय?
१) पाणी ग्रहण करणे २) पाणी मुरणे ३) पाणी पडणे ४) पराभव करणे

६) वाक्यप्रचार व त्यांचे अर्थ यांच्या योग्य जोड्या जुळवा.

| | |
|---|---|
| a) बोळवण करणे | i) गप्प बसविणे |
| b) फारकत घेणे | ii) मत्सर करणे |
| c) पुंगी बंद करणे | iii) संबंध तोडणे |
| d) पोटशूळ उठणे | iv) निरोप देणे |

**पर्यायी उत्तरे :**

१) a - (iv), b - (iii), c - (i), d - (ii)
२) a - (iii), b - (i), c - (iv), d - (ii)
३) a - (iv), b - (iii), c - (ii), d - (i)
४) a - (iv), b - (ii), c - (i), d - (iii)

७) स्वभावो 'दुरतिक्रम :' या संस्कृत वाक्यप्रचारासाठी समर्पक अर्थाचा पर्याय ओळखा.
१) स्वभाव दूरपर्यंत तोच राहतो
२) स्वभावाला मुरड घालणे
३) स्वभावाला औषध नाही
४) स्वभाव चांगल्या कर्माने बदलण

८) 'आंधळ्याला भिक्षा वाढा बाई । तुमचा बोलबाला होईल' या वाक्यातील वाक्यप्रचाराचा योग्य अर्थ पुढीलपैकी कोणता?
१) भूकेल्याला अन्न देणे
२) आंधळ्याला मदत करणे
३) चांगली कृती करणे
४) उत्कर्ष होणे

९) 'डोळ्यावर कातडे ओढणे' या वाक्यप्रचाराच्या विरुद्ध अर्थ सुचवणारा वाक्यप्रचार पुढीलपैकी कोणता ?
१) डोळे भरून पाहणे
२) डोळे उघडणे
३) डोळ्यात धूळ फेकणे
४) डोळ्यात तेल घालून पाहणे

*१०) पुढील वाक्प्रचारातील चुकीच्या जोड्या ओळखा.*
*अ) छाती फाटणे – दुःखाने मन अत्यंत व्यथित होणे*
*ब) घरावर गवत उगवणे – घराला वैभव प्राप्त होणे*
*क) मागमूस नसणे – ठावठिकाणा नसणे*
*ड) रजाचा गज करणे – एखाद्याचे काम बिघडवून टाकणे*
***पर्यायी उत्तरे :***
*१) (अ) व (क) बरोबर   २) (अ) व (ब) बरोबर   ३) (अ) व (ड) बरोबर   ४) (अ), (ब), (क) बरोबर*

## (३) योग्य अर्थाची म्हण/पर्यायी म्हण निवडणे

१) चांगली अद्दल घडली म्हणजे मनात शंका राहत नाही. अनुभवाने शहाणपण येते. या अर्थाची म्हण कोणती?
a) कोरडा बसला आणि संशय फिटला
b) वळ उठला पण संशय फिटला
c) हा सूर्य आणि हा जयद्रथ

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त (a) व (b) बरोबर, (c) चूक
२) फक्त (b) व (c) बरोबर, (a) चूक
३) फक्त (a) बरोबर, (b) व (c) चूक
४) फक्त (b) बरोबर, (a) व (c) चूक

२) समानार्थी म्हणींच्या **योग्य** जोड्या जुळवा.

| | |
|---|---|
| a) फुल ना फुलाची पाकळी | i) पन्नास आचारी अन् वरणात मीठ भारी |
| b) आठशे लष्कर अन् नवशे आचारी | ii) चमडी जाय लेकीन दमडी न जाय |
| c) तीन तिघाडा अन् काम बिघाडा | iii) थोडक्यात नटावे अन् प्रेमाने भेटावे |
| d) तो पाप देणार नाही तर पुण्य कसले देतो? | iv) अंगापेक्षा मोठा बोंगा कुठे चालला सोंगा |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| १) | (iii) | (i) | (iv) | (ii) |
| २) | (iii) | (iv) | (i) | (ii) |
| ३) | (iv) | (iii) | (i) | (ii) |
| ४) | (ii) | (iii) | (iv) | (i) |

३) अतिशय परिश्रम करूनही अल्प फळ हाती आल्याने शंकर आता कोणताही गाजावाजा न करता छोटी–छोटी कामे करतो. संदर्भानुसार योग्य म्हण ओळखा.

a) पालथ्या घड्यावर पाणी
b) डोंगर व्याला उंदीर झाला
c) पाण्यात म्हैस, अन व्यवहाराला बैस
d) डोंगर पोखरून उंदीर काढणे

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त (a) आणि (c) बरोबर
२) फक्त (b) आणि (d) बरोबर
३) फक्त (b) बरोबर
४) फक्त (d) बरोबर

४) 'रामभाऊंचे पैसे गोविंदरावाला आपले म्हणून देणे आणि गोविंदरावांपुढे आपली फुशारकी मिरवणे' हा आशय सुचित करणारी पुढीलपैकी योग्य म्हण कोणती ?

१) हाती धरला रोडका आणि डोई धरला बोडका
२) शेरास सव्वा शेर
३) पैसा दक्षिणा आणि लक्ष प्रदक्षिणा
४) हलवायाच्या घरावर तुळशीपत्र

५) पुढील विवेचनाला योग्य म्हण ओळखा.
गणपतरावांवर खूप संकटे आली. सततच्या कडीबंदीमुळे धंदा डबघाईला आला. तरी त्यांनी कामगारांना दिलेले आर्थिक मदतीचे वचन शेवटपर्यंत पाळले. म्हणतात ना ......

१) हातावर कमवावे हातावर खावे
२) जैसा देव तैसा भाव
३) हिरा जो ठेविता ऐरणी, वाचे मारता तो घणी
४) सांगितल्या कामाचा दिल्या भाकरीचा

६) 'शेतातील पिक चांगले आल्यामुळे रंगरावांनी कर्जापोटी काही रक्कम जमा केली, आपला <u>कर्जबोजा थोडासा हलका झाल्याने</u> ते आनंदीत झाले' या वाक्यातील अधोरेखित शब्दातील आशय सूचित करणारा योग्य 'वाक्यप्रचार' ओळखा.

१) डोक्यावरून पाणी फिरणे
२) डोकीवरचे खांद्यावर येणे.
३) डोके हलके होणे
४) कर्ज मुक्त होणे

७) 'अंग मेहनतीने पैसे मिळवून उपजीविका करणे' या अर्थाची म्हण ओळखा.

१) हातावर पोट भरणे
२) हात गहाण ठेवणे
३) हातावर आणणे
४) हातावर मिळविणे

८) 'आपली पाठ आपल्याला दिसत नाही' या म्हणीची समानार्थी म्हण ....

१) दोन डोळे शेजारी भेट नाही संसारी
२) दुसऱ्याच्या डोळ्यातले कुसळ दिसते पण आपल्या डोळ्यातले मुसळ दिसत नाही.
३) आपला हात जगन्नाथ
४) एका हाताने टाळी वाजत नाही

९) ज्याने वाईट कृत्य केले नाही, त्याला भीती बाळगण्याचे कारण नाही. या अर्थाची म्हण खालील पर्यायामधून निवडा.

अ) करावे तसे भरावे
ब) कर्म तसे फळ
क) कर नाही त्याला डर नाही
ड) कर आहे त्याला डर आहे

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त अ बरोबर बाकी सर्व चूक
२) फक्त अ व ड बरोबर बाकी सर्व चूक
३) अ, ब, क, ड सर्व चूक
४) फक्त क बरोबर बाकी सर्व चूक

१०) 'वस्तुस्थितीपेक्षा तिचे अवडंबरच मोठे' या अर्थाची म्हण ओळखा.

१) नाव मोठे लक्षण खोटे
२) कानामागून आली तिखट झाली
३) अंगापेक्षा बोंगा मोठा
४) आयत्या बिळावर नागोबा

११) ''जे दुःखात आहेत ते रडतात व सध्या जे सुखात आहेत ते आनंद साजरा करतात.'' या अर्थाची म्हण कोणती ते सांगा.

१) रोज मरे त्याला कोण रडे
२) जात्यातले रडतात आणि सुपातले हसतात
३) सुख पाहता जवापाडे दुःख पर्वताएवढे
४) आयत्या बिळात नागोबा

१२) 'दुसऱ्याने आपल्या विरोधात तक्रार करण्यापूर्वी आपणच त्या विरोधात तक्रार करावी.' या अर्थाची म्हण कोणती ते सांगा.

१) अडला कोल्हा मंगल गाय
२) अहेर नारळाचा आणि गजर वाजंत्र्यांचा
३) अस्वलाआधी आरोळी
४) अटक्याचा सौदा येरझारा चौदा

१३) 'वरपांगी नको असल्याचे सोंग करून एखादीच्या पाठीमागे लाभ मिळविण्यासाठी जाणे.' या अर्थाची म्हण कोणती?

१) नगं नगं म्हणत पायलीच्या मागं पळणं.
२) आगीतून निघावे अन् फुफाट्यात पडावे.
३) अगं अगं म्हशी मला कुठे नेशी.
४) ओठापर्यंत आले पण पोटात नाही गेले.

## (४) पर्यायी वाक्प्रचार

१) गणपत अण्णाला अंग राखून काम करण्याची सवय आहे. या वाक्याच्या अर्थाचा अचूक असलेला वाक्प्रचाराचा पर्याय कोणता?

१) काडीमोड घेणे
२) कां–कूं–करणे
३) आटापिटा करणे
४) काडीने औषध लावणे

२) विचार करणे सोपे नाही, डोके दुखू लागणे हे त्याचेच लक्षण आहे. या स्पष्टीकरणाच्या अर्थाचा वाक्प्रचार ओळखा.

a) डोके उठणे
b) डोके भडकणे
c) डोके वर काढणे
d) डोखे खाजवणे

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त (a) व (d) बरोबर
२) फक्त (b) व (c) बरोबर
३) फक्त (c) व (d) बरोबर
४) फक्त (a) व (b) बरोबर

३) 'शिवाजी महाराजांच्या साथीने निवडक मावळ्यांनी एकनिष्ठतेची <u>शपथ घेतली.</u>' या विधानातील अधोरेखित शब्दाला योग्य वाक्प्रचार ओळखा.

१) फुले वाहाणे
२) बेलभंडारा उचलणे
३) वाचा सिद्ध करणे
४) नमन करणे

४) अमेरिकेत राहणाऱ्या मुलाने साताराच्या शेतजमीनीवर ..........
रिकाम्या जागी अचूक वाक्प्रचार योजून योग्य वाक्य कसे होईल ?
अ) अमेरिकेत राहणाऱ्या मुलाने साताराच्या शेतजमिनीवर बेलपत्र ठेवले आहे.
ब) अमेरिकेत राहणाऱ्या मुलाने साताराच्या शेतजमिनीवर पाणी सोडले आहे.
क) अमेरिकेत राहणाऱ्या मुलाने साताराच्या शेतजमिनीवर तुळशीपत्र ठेवले आहे.
ड) अमेरिकेत राहणाऱ्या मुलाने साताराच्या शेतजमिनीकडे डोळे झाक केली आहे.

**पर्यायी उत्तरे :**
१) फक्त (अ) व (ब) अचूक आहे. २) फक्त (ब) पर्याय अचूक आहे.
३) फक्त (क) व (ब) अचूक आहे. ४) फक्त (अ) व (ड) अचूक आहे.

५) विचार करणे सोपे नाही, डोके दुखू लागणे हे त्याचेच लक्षण आहे. या स्पष्टीकरणाच्या अर्थाचा वाक्प्रचार ओळखा.
a) डोके उठणे b) डोके भडकणे c) डोके वर काढणे d) डोखे खाजवणे

**पर्यायी उत्तरे :**
१) फक्त (a) व (d) बरोबर २) फक्त (b) व (c) बरोबर ३) फक्त (c) व (d) बरोबर ४) फक्त (a) व (b) बरोबर

६) 'माझे नुकतेच जेवण झाले होते पण वेदांशच्या आग्रहामुळे मी थोडा आहार घेतला.' अधोरेखित वाक्यांसाठी योग्य वाक्प्रचार.
१) तोंड घालणे २) तोंड काळे करणे ३) तोंड उष्टे करणे ४) तोंडसुख घेणे

## (५) म्हणीचा / वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग

१) 'केळीवर नारळी अन घर चंद्रमौळी' या म्हणीचा खालीलपैकी योग्य अर्थ असलेला पर्याय कोणता?
a) अत्यंत श्रीमंत स्थिती असणे b) अत्यंत गरिबीची स्थिती असणे
c) अत्यंत चांगली परिस्थिती असणे d) अत्यंत मजबुरीची स्थिती असणे

**पर्यायी उत्तरे :**
१) फक्त (a) व (c) बरोबर, (b) व (d) चूक २) फक्त (a) बरोबर, (b), (c) व (d) चूक
३) फक्त (b) बरोबर, (a), (c) व (d) चूक ४) फक्त (c) बरोबर, (a), (b) व (d) चूक

२) 'लोभाजीरावाने जास्त जमीन प्राप्त करण्यासाठी खूप धावाधाव केली; पण अति लोभाने त्याचा मृत्यू झाला' याला म्हणतात ना ...
१) आयत्या बिळावर नागोबा २) अति शहाणा त्याचा बैल रिकामा
३) अति तिथे माती ४) एक ना धड भारभार चिंध्या

३) 'थंडा फराळ' या म्हणीचा समर्पक वापर असलेली वाक्यरचना कोणती?
a) रात्री पाहुण्यांना थंडा फराळ देऊन झोपविले.
b) सखाराम नेहमीच थंडा फराळ करतात.
c) राम घरी उशीराने आल्याने आईने त्याला थंडा फराळ देऊन झोपविले.
d) 'थंडा फराळ' झाला म्हणून काय खायचा नाही?

**पर्यायी उत्तरे :**
१) फक्त (a) व (b) बरोबर २) फक्त (b) व (d) बरोबर
३) फक्त (a) बरोबर ४) फक्त (c) व (d) बरोबर

४) ''मी त्याला विचारले आहे ना ? आमचे आम्ही पाहून घेऊ. आमच्यामध्ये ............ तुला सांगितले कोणी ?''
– यामध्ये गाळलेल्या जागेवर पुढीलपैकी कोणता वाक्यप्रचार बरोबर ठरेल ?

१) तोंड वासणे
२) तोंडावर तुकडा टाकणे
३) तोंड दिसणे
४) तोंड घालणे

५) ज्याचा अपकर्ष व्हावयाचा असतो त्याची वाईट गोष्टीकडे प्रवृत्ती आपोआप जाते. म्हणून म्हणतात ना .......... हेच खरं! रिकाम्या जागी योग्य म्हण कोणती ?

१) भित्याच्या पाठीस ब्रह्मराक्षस
२) भांडणांचे तोंड काळे
३) बुडत्याचा पाय खोलात
४) दात कोरून पोट भरणे

Study CIRCLE

उत्तरे : महाराष्ट्र अराजपत्रित सेवा मुख्य परीक्षा (गट ब)/(गट क) २०२३

पेपर क्रमांक –१ : मराठी व इंग्रजी

# (४) मराठी म्हणी व वाक्प्रचार (अर्थ व उपयोग)

## (१) म्हणीचा योग्य अर्थ

१–२ २–४ ३–२ ४–४ ५–३ ६–४ ७–२ ८–३ ९–२

## (२) वाक्प्रचाराचा योग्य अर्थ

१-४ २–१ ३–३ ४–४ ५–४ ६–१ ७–३ ८–४ ९–४ १०–१

## (३) योग्य अर्थाची म्हण/पर्यायी म्हण निवडणे

१–१ २–२ ३–२ ४–४ ५–३ ६–२ ७–१ ८–२ ९–४ १०–३
११–२ १२–३ १३–३

## (४) पर्यायी वाक्प्रचार

१–४ २–१ ३–२ ४–२ ५–१ ६–३

## (५) म्हणीचा/वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग

१–३ २–३ ३–१ ४–४ ५–३

Study CIRCLE